# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

# कंत्राटी कामगार रोजंदारी दर निश्चित निविदा

कामाचे नांव कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष येथे कुशल आणि अकुशल कंत्राटी पध्दतीने कामे करण्याकरीता एकूण ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी मजूर पुरविणे.

निविदाधारकाचे नांव :- .....................................................

## <u>अनुक्रमणिका</u>

कामाचे नांव : **कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष** येथे कुशल आणि अकुशल कंत्राटी पध्दतीने कामे करण्याकरीता एकूण ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी मजूर पुरविणे.



| अ. क्र | तपशिल | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यंत** |
| १ | निविदा सुचना | | |
| २ | सविस्तर निविदा सूचना | | |
| ४ | कामाचे विवरणपत्रक | | |
| ५ | निविदा पत्रकाविषयी नियम अटी व शर्ती | | |
| ७ | Commercial Bid (Proforma for submission of tender rates) | | |



Signature of the Contractor with Seal
Date :

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

निविदा सूचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत **कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष या विभागामध्ये** कुशल, अकुशल कंत्राटी मजूरांची कामे कंत्राटी पध्दतीने एकूण ११ महिने कालावधी करीता करून घेण्यासाठी निविदेतील अटी व शर्तीचे अधिन राहुन मान्यताप्राप्त परवाना धारक व कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा परवाना असलेल्या कंत्राटी मजूर ठेकेदारांकडून सिलबंद निविदा दि. १५/०१/२०२५ पर्यंत मागवित आहोत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| **अ. क.** | **कामाचे नांव** | **कामाची अंदाजीत किंमत रू.** | **बयाणा रक्कम रू.** | **कामाचा कालावधी** | **को-या निविदा पत्रकाची किंमत रू.** | **पात्रता वर्ग** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष येथे कुशल, अकुशल कंत्राटी पध्दतीने कामे करण्याकरीता एकुण ११ महिने प्रत्यक्ष प्रती महिना हजर दिवसानुसार कालावधीकरीता कंत्राटी मजूर पुरविणे. | ६०००००/- | Nil | ११ महिने प्रत्यक्ष प्रती महिना हजर दिवसानुसार | Nil | |

सदरील कामाची सविस्तर निविदा सुचना, वेळापत्रक व अटी शर्ती इ. सर्व माहिती www.pdkv.ac.in या पोर्टलवर प्रकाशित करण्यात आली आहे.

जा.क्र. ARIS/tender/161/2025
दि. 06/01/2025

-स्वाक्षरीत-
प्रभारी अधिकारी
कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष

1. The interested contractors will have to submit all required documents i.e.copy of valid registration, PAN card etc. .
2. The offer will be valid for 120 days from the date of opening the tender.
3. The tenderer should complete all the formalities within 10 (Ten) days from the date of acceptance of tender. If the tenderer fails, it will be considered that the tenderer is not interested and the next lowest tenderer shall be considered as the lowest tender. In this case, no representation shall be accepted after 10 days.
4. The other Terms and Conditions are available in tender form uploaded on above website.
5. The Authority reserves the right to reject any or all tendrs without assigning any reason and no explanation shall be offered for the rejection.
6. Tender can be rejected by the authority without assigning any reason and no explanation can be demanded for the rejection of the offer by the person/ firm submitting tender.
7. Presence of the contractor or his authorized representative is essential while tender opening otherwise their tender will not be opened. Representative should have the proper authority letter with him.
8. The date of opening of tender is tentative and subject to change, as per the availability of date and time of the competent authority.
9. Please take a note that the tender will be finalized on the basis of Service Charge (Contractural Commission) per day per unit.
10. If required, the authority shall call the tenderer for negotiations. In this case the decision of the authority shall be final.

-sd-
Officer in Charge
ARIS Cell

# डा. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला

---

<u>कामाचे विवरणपत्रक</u>

**विषय :-** कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष येथे कंत्राटी पध्दतीने कामे करणेकरीता एकुण ११ महिने ; प्रत्यक्ष हजर दिवस प्रति महिना कालावधिकरीता कुशल आणि अकुशल कंत्राटी मजूर पूरविणे

कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष येथे कुशल, अकुशल मजुरांची कामे कंत्राटी पध्दतीने करून घेण्यासाठी निविदेतील अटी व शर्तींचे अधीन राहुन परवानाधारक कंत्राटी मजूर ठेकेदारांकडुन सीलबंद निविदा मागवून एकुण ११ महिने कालावधीकरीता करून घ्यावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क. | मजूरांचे वर्गीकरण | कामाचा तपशील |
|---|---|---|
| १ | कुशल | Assisting in Solving/ troubleshooting the technical problem involved in existing Campus LAN / WIFi, Solving the problem in Computers/ Laptop/ other Computer related peripheral hardware, Assisting in technical online presentations and meeting on online platform like MS-Teams, Zoom etc. and other technical work in IT related with time to time instructions from office |
| २ | कुशल | Doing the clerical work, Inword/ Outward, Preparation of bills and entering it into IUMS Software and following its complete cycle till the issue of Cheque to Staff or third party. Notes preparation and preparing the file for it and other clerical work |
| ३ | कुशल | For handling Attemdance Management Software and Generaring daily monthly attendance reports and submitting to respective head of offices and VC Office and Registrar Office |
| **अ. क.** | **मजूरांचे वर्गीकरण** | **कामाचा तपशील** |
| ३ | अकुशल | कुशल कंत्राटी मजूरांना सहाय करणे, कार्यालय व परिसर स्वच्छतेची कामे करणे, पाणीपुरवठा करणे, प्रयोगशाळा कामकाजामध्ये मदत करणे, कार्यालय टपालाची नोंद व वाटप करणे, बेल घेणे, लेखा विभागामध्ये व्हाउचर पोस्टींग करणे, पोस्ट, बॅक संबंधीत व बाहेरील तत्सम कामकाज करणे, भांडार विभागाशी संबंधीत कामे करणे, वरिष्ठांनी वेळोवेळी निर्देशित केलेले कामे करणे. |

--स्वाक्षरीत--
प्रभारी अधिकारी
कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

निविदा पत्रकाविषयी नियम, अटी व शर्ती

१. निविदा प्रक्रियेसाठी www.pdkv.ac.in या संकेतस्थळांवर कागदपत्रे डाउनलोड करून निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल.

२. निविदा पत्रकासंबंधीची सविस्तर माहिती **कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष** यांचे कार्यालयात मिळेल.

३. निविदा सादर करतांना ऑनलाईन निविदा डाउनलोड करून **प्रत्यक्ष नमूद कार्यालयामध्ये सीलबंद पाकिटामध्ये** दर भरावे.

४. निविदा सादर कर्त्याने खालील कागदपत्रे स्वसाक्षांकित करून **सीलबंद पाकिटामध्ये भरने** गरजेचे आहे. निविदा सादर कर्त्याने निविदा पत्रकात दिलेले दर स्पष्ट व स्वच्छ दिसतील या प्रमाणे भरून सही व शिक्यासहीत वित्तीय लिफाफ्यात **भरावे.**

१. कंत्राटी मजूर पुरविण्याचा अद्ययावत परवान्याची सत्यप्रत.

२. कंत्राटदाराच्या आस्थापनेचे (कंपनी/ संस्था) पॅन/ टॅन कार्ड व निवीदेवर स्वाक्षरी करणा-याचे आधार कार्डची छायांकिंत सत्यप्रत.

३. कमीत कमी मागील **एक** वित्तीय वर्षाचा विद्यापिठात अथवा शासकीय/ निमशासकीय कार्यालय/ संस्था यांना कंत्राटी मजूर पुरविल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत. तसेच संबंधीत कार्यालयात काम समाधानकारक पुर्ण केल्याच्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत. सदर कार्यालयाच्या कार्यालय प्रमुख/ संबंधीत व्यक्तीचे पुर्ण नांव व संपर्क कमांक.

४. निविदा सादरकर्त्यांने कोणत्याही शासकीय/ निमशासकीय महामंडळाच्या काळ्या यादीत नांव समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र सादर करावे.

५. भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

६. व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

७. ई.एस.आय.एस. (Employees State Insurance Scheme) नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

८. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत.

९. निविदा समितीने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणत्र निविदा धारकाने सादर करावे.

५ कंत्राटदाराने कंत्राटी मजुराचे मासिक दर नमुद करतांना Commercial Bid मध्ये Basic Wages + Variable Dearness Allowance यांच्या एकुण रक्कमेवर त्याला आकारावयाच्या त्याच्या Service Charges (कमीशन) ची गणना करणे अपेक्षित आहे. निविदेची तुलना Commercial Bid मध्ये नमूद करण्यात आलेल्या अ.क. ९ च्या रक्कमेवर करण्यात येईल. सारखे दर आल्यास संबंधीतांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात येईल व अनुभव, त्यांच्या आस्थापनेचे वार्षिक उलाढाल इ. बाबी विचारात घेऊन अंतिम निर्णय संबंधीत निवीदा समिती घेईल.

६ निविदा सादरकर्त्याने निविदा पत्रकात दिलेले दर स्पष्ट व सुवाच्च दिसतील याप्रमाणे अंकी व अक्षरी भरून सही व शिक्क्यासहीत **भरावेत.**

७ खाडातोड असलेली, पांढरी शाई लावलेली अथवा इतर कोणत्याही कारणास्तव निविदा खराब झालेली असल्यास तिचा विचार केला जाणार नाही.

८ दरपत्रकात दर भरून **सीलबंद पाकिटात सदर करावेते.**

९ कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराचे वेतन रोखीने अदा न कराता Account Payee Cross Cheque व्दारे अदा करणे किंवा बॅकेत खाते उघडून त्यांचे मासिक वेतन त्यांचे बॅक खात्यात महिन्याच्या पाच तारखेच्या आत जमा करणे बंधनकारक राहील.

१० कंत्राटदाराने करारनामा लिहून दिल्यानंतर मागणी केल्यानुसार कंत्राटी मजुर पुरविणे बंधनकारक राहील. तसे करण्यास ठेकेदार असमर्थ ठरल्यास नोंदणी रद्द करण्यास कामगार आयुक्त यांचेकडे शिफारस करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्याचे नाव काळ्या यादीत समावेश करून त्यानंतर **या कार्यालयाच्या** तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या निविदा प्रक्रियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही.

११ कंत्राटदाराने निविदेत कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमुद करू नये. थोडक्यात कृषि विद्यापिठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कामगारांस वेतन देणे बंधनकारक राहील.

१२ ज्या कंत्राटी मजूरांचा भविष्य निर्वाह निधी खाते कमांक (UAN) कार्यान्वीत नसेल, त्यांना कामावर घेण्यात येवू नये तसेच नविन कंत्राटी मजूर कामावर घ्यावयाचे असल्यास प्रथम त्याचे भविष्य निर्वाह निधी खाते कमांक (UAN) कार्यान्वित करून कामावर घेणे बंधनकारक राहील.

१३ बाल मजूर कायद्याचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१४ कंत्राटदाराने नेमलेल्या कामागाराचा पगार, रजा, ग्रॅज्युएटी, बोनस, विमा योजना, पि.एफ., ई. एस.आय.सी. इत्यादी देयक बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/ वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या बाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास **प्रभारी अधिकारी कृषी संशोधन माहिती प्रणाली कक्ष** हस्तक्षेप करणार नाहीत. अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची/ विद्यापीठाची राहणार नाही.

१५ कंत्राटदाराने कामगारास दर महा अदा केलेल्या भविष्यनिर्वाह निधी, गट विमा पावती व वेतन चिठ्ठी दरमाह संबंधीत कार्यालयास देणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्याचे पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१६ कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वहया ठेवणे व ते संबंधीत अधिका-याकडून तपासून घेणे बंधनकारक राहील व त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

१७ कार्यालयाचे कामकाज सुट्टीच्या दिवशीही चालत असल्याने वेळोवेळी कंत्राटी मजूरांना सुट्टी देणे, कमी जास्त प्रमाणात कंत्राटी मजूर पूरवठा करणे व प्रत्येक कंत्राटी मजूरांना साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक राहील.

१८ शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधीची कुठलीही जबाबदारी **कार्यालयाची** राहणार नाही.

१९ प्रत्येक कंत्राटी मजूरांना कॉन्टॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

२० कंत्राटी मजूरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यु संभविल्यास किंवा नैसर्गीक आपत्ती उदा. विज, पाउस, भूकंप, मशीनरी अपघात, प्राणी/ साप आणि वादळामुळे इजा अपघात मृत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशिर जबाबदारी कंत्राटदाराची राहील यांचा महाविद्यालय/ कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२१ कंत्राटी पध्दतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्टर/ कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास संबंधीतांचा करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यानंतर **या कार्यालयाच्या** तसेच कोणत्याही विद्यापीठाच्या निविदा प्रकियेत संबंधित ठेकेदारास भाग घेता येणार नाही. उपरोक्त कारणामुळे काही कायदेशिर बाबी उत्पन्न झाल्यास त्याचा विद्यापीठाशी काहीही संबंध राहणार नसून त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील.

२२ कंत्राटदारास सेवा पुरवितांना कार्यालयास एक संपर्क अधिकारी असणे अनिवार्य राहील. जो महाविद्यालय/ कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजात कंत्राटी मजुरांबाबत येणा-या अडचणींचा तात्काळ निपटारा करेल.

२३ पुरविण्यात येणा-या कुशल व अकुशल कंत्राटी मजूरांचा इ.एस.आय.सी. कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील. याबाबतची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२४ कामाकरीता नेमलेल्या कंत्राटी मजूरांचा नियमानुसार सामुहिक विमा कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहील.

२५ निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या कामाचा सर्व अटी व शर्तींचा करारनामा रू. १००/-च्या स्टॅम्प पेपरवर त्वरित करून दयावा लागेल.

२६ सुरक्षा अनामत रक्कम मंजूर कंत्राटाच्या रक्कमेच्या ३ टक्के प्रमाणे नियंत्रक डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे असलेल्या धनाकर्षाव्दारे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

२७ कंत्राटदाराने काम अर्धवट/ समाधानकारक न केल्यास, उर्वरित काम कंत्राटदाराच्या सुरक्षा रक्कम जप्त करण्यात येईल.

२८ संबंधित कार्यालयाच्या सुचनेनुसार काम मुदतीत पुर्ण करावे लागेल.

२९ कंत्राटी मजुराने काम समाधानकारक रित्या न केल्यास त्याला त्या दिवशी परत पाठविण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी मजुराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

३० कामात कचुराई व हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे नुकसान झाल्यास, दंडासह भरपाई करावी लागेल.

३१ निविदा उघडल्यानंतर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेत लघुत्तम दर सादर कर्त्यांशी दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीस राहतील.

३२ कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार निविदा समिती राखून ठेवला आहे.

३३ कार्यालयाकडून विलंबनाने देयक जमा झाले तरी प्रत्येक महिन्याच्या वेतन पाच तारखेपर्यंत संबंधीत कंत्राटी मजूरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.,पि.एफ, कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्यांचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलाने प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३४ कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या मजूरांची हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. तसेच संबंधीत विभागप्रमुख यांना केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील. व तपासणीमध्ये कंत्राटी मजूर कामावर न आढळल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.

३५ किमान वेतन व वेतन प्रदान अधिनियमातील विहीत दरानुसार विहित वेळी ठेकेदाराने कंत्राटी मजूरांना वेतन द्यावे. काही तांत्रीक कारणामुळे महाविद्यालय/ कार्यालयाकडून वेतन देण्यास उशिर झाल्यास ठेकेदाराने ठरलेल्या वेळेत कामगारांना वेतन देणे बंधनकारक आहे.

३६ कंत्राटदार यांच्याकडून वरिल पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजूरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून विद्यापीठाकडे जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

३७ किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायित्व विचारात घेउन विद्यापिठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेउन निविदेचे दर ठरविले जातात तसेच ठेक्यापाटी निम्यात येणा-या कामगारांना किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने, प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे निविदा दर केवळ सर्वात कमी दराचे आहे. म्हणून स्वीकारले जाणार नाही. याची नोंद कंत्राटदाराने घ्यावी.

३८ आवश्यकतेनुसार कंत्राटी मजूर पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कामावर एखाद्या मजुराचे काम कार्यालयात असमाधानकारक वाटल्यास त्याचे जागी तात्काळ दुसरा कंत्राटी मजूर बदलून द्यावा लागेल.

३९ इच्छुक निविदा सादर कर्त्यांनी आपले दरपत्रक सादर करतांना वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय/ विद्यापीठ/ महाविद्यालय/ कार्यालय यांच्या आदेश/ अधिसुचना परिपत्रकाची काटेकोपणे पालन करणे तसेच मुळ किमान वेतन, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करून दरपत्रक सादर करणे निविदा सादरकर्त्यास बंधनकारक राहील.

४० कामाचा कालावधी आदेश दिल्यापासून एकुण ११ महिने कालावधी करीता राहील. तथापी कार्यालय सदर कंत्राट मुदतपुर्व रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. तसेच आवश्यकतेनुसार एका वेळी एक महिना असे जास्तीत जास्त तीन वेळा सहमतीने कंत्राटाचा कालावधी वाढवता येईल.

४१ शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधीत निविदाधारकाने भरणे बंधनकारक राहील. निविदेमधील दर सर्व कर समाविष्ट करून द्यावेत.

४२ कराराचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतीम निर्णय विद्यापीठाचा राहील.

४३ कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दुस-या क्रमांकाच्या लघुत्तम निविदाधारकास प्रथम क्रमांकाच्या निविदाधारकाने नमुद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील. तसेच दुस-या क्रमांकाच्या निविदा धारकाने अमर्थता दर्शविल्यास तिस-या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकाने प्रथम क्रमांकच्या निविदा धारकाच्या दरात काम करण्याची संमर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

४४ उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे ठेकेदार निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्यास अधिकृत ठरतील.

४५ कंत्राटदाराने नियम व अटी काळजीपुर्वक वाचून या अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रपत्र निविदा सादरकर्त्यास निविदा सादर करतेवेळी जोडणे बंधनकारक राहील.

४६ या निविदेबाबत/ प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय हे राहील.

-sd-
Officer in Charge
ARIS Cell
Dr. PDKV., Akola

**COMMERCIAL BID – A**

Name of the work :- Supply of contractural skilled and unskilled labours for the works detailed in the tender for the period eleven months at Agricultural Research Information System Cell

**PROFORMA FOR SUBMISSION OF TENDER RATES (COMMERCIAL BID)**

| Sr. No. | Description | Unskilled contractual labour (Rs.) # | Skilled contractual labour (Rs.) # |
|---|---|---|---|
| 1 | Basic Wages | 4680.00 | 6240.00 |
| 2 | Variable Dearness Allowance | 4002.00 | 4002.00 |
| | **Total Minimum Wages** | **8682.00** | **10242.00** |
| 3 | EPF 13% | 1128.66 | 1331.46 |
| 4 | ESIS 4% | 347.28 | 409.68 |
| 5 | Total Rs. | 10157.94 | 11983.14 |
| **8** | **Service Charges per month per unit for skilled / unskilled labour (Rs.)** ** | | |

# Rates mentioned here are applicable for Zone Akola city as per prevailing Minimum Wages Act. It is mandatory upon the tenderer to pay the wages as per the Act to the Contractual Labour.

* These should be mentioned in percentage and calculated on the total amount of Basic Wages + Variable Dearness Allowance i.e. Total Minimum Wages.

** Financial Bid shall be compared on the amount mentioned in this row. These rates should be mentioned in the commercial bid.

Place:

Date: Name and Signature of tenderer

(Seal)